# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट २०-२०२५** **दिनांक :- १५/०१/२०२५**

## "डिसेंबर महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार "

-------------------------------------

## डिसेंबर महिन्यातील उत्कृष्ठ दोषसिद्ध झालेले गुन्हे

➢ **मिरारोड विभाग (खून व चोरी) :-**

**(काशिमीरा पोलीस स्टेशन गुरनं ५१/२००८ भा.दं.वि.सं.कलम ३०७,३९७,३४२ प्रमाणे व काशिमीरा पोलीस स्टेशन गुरनं ४७/२००९ भा.दं.वि.सं.कलम ३७९,३४ अन्वये)**

काशिमीरा पोलीस स्टेशन गुरनं ५१/२००८ भा.दं.वि.सं. कलम ३०७, ३९७, ३४२ प्रमाणे नमुद गुन्हयाचा तपास सहा.पोलीस निरीक्षक रविंद्र अडाणे, तत्कालीन नेम. काशिमीरा पोलीस ठाणे यांनी केला असून गुन्हयातील आरोपीतास अटक करून, गुन्हयातील गेला माल हस्तगत करून, वापरलेले हत्यार हस्तगत करून, सबळ पुरावे गोळा करून अटक आरोपीविरुध्द मा. ठाणे सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. त्याचा केस क्रमांक ३४१/२०११ असा आहे. मा. न्यायालयाने केस चालवुन दिनांक १६.१२.२०२४ रोजी अटक आरोपीत नामे मोईन मोहम्मद अन्सारी उर्फ मोईन मधु अन्सारी यास भादवि ३०७ करीता ०७ वर्षे सश्रम कारावास व ५०० रुपये दंड, दंड न भरल्यास ०३ महीने साधा कारावास, भादवि ३९७ करीता ०७ वर्षे सश्रम कारावास आणि भादवि ३४२ करीता ०६ महीने साधा कारावास व ५०० रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

काशिमीरा पोलीस स्टेशन गुरनं ४७/२००९ भा.दं.वि.सं. कलम ३७९, ३४ अन्वये दिनांक ०३.०३.२००९ रोजी दाखल आहे. नमुद गुन्हयाचा तपास पोना/७४६ पी.वाय.घोसाळकर यांनी केला असून गुन्हा उघडकीस आणुन गुन्हयातील आरोपीतांस अटक करून, मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाप्रमाणे तपास करून अटक आरोपींविरुध्द मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.ठाणे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते त्याचा केस क्रमांक आर.सी.सी. ८३३/२०१० असा आहे. मा. न्यायालयाने दिनांक १४.१२.२०२४ रोजी अटक आरोपीत सनी बाळकृष्ण बोध यास ०८ महीने २१ दिवस साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

**कामगिरी करणा-या अधिकारी व अंमलदारांची नावे :-** १. वपोनि./श्री एल.एम.तुरे, २. पोना/७४६, पी.वाय.घोसाळकर, ३. पोहवा.०६०२६, रमेश गायकवाड कोर्ट डयुटी अंमलदार ४. पोशि/२३००५, सुनिल खाडे समन्स डयुटी अंमलदार ५.पोशि/१७०५१, सुरज बजंत्री नेम. काशिमीरा पोलीस ठाणे.



➢ **भाईंदर विभाग (चोरी) :-**

(भाईंदर पोलीस स्टेशन गुरनं. ३९६/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३०५(अ) ३३१ (३) ३३१(४) प्रमाणे)

भाईंदर पोलीस स्टेशन गुरनं. ३९६/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम कलम ३०५(अ) ३३१ (३) ३३१(४) प्रमाणे दि.२४/१२/२०२४ रोजी २३.०० वाजता ते दि.२५/१२/२०२४ रोजी ०९.०० वाजेच्या दरम्यान मुर्धाखाडी उत्तन रोड भाईंदर पश्चिम येथे असलेल्या सिध्दीविनायक केमिस्ट ॲण्ड जनरल स्टोअर्स नावाचे दुकानाचे छताचे पत्रे उचकटवून त्याव्दारे आतमध्ये प्रवेश करून अज्ञात व्यक्तीने १०,०००/- रूपये चोरी करून नेले म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला. सदरचा गुन्हा दाखल होताच मा. व.पो.नि. यांचे आदेशान्वये गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हयाचा तपास सुरू करून सदरचा गुन्हा करण्याचे पध्दत पाहता अशाप्रकारचे गुन्हे करणारे आरोपीचा शोध घेत असताना बातमीदार मार्फत माहिती मिळवून दि.२५/१२/२०२४ रोजी सापळा रचुन संशयीत इसम नामे सचिन लखन मंडल, वय २० वर्षे, व्यवसाय बेकार, रा.गल्ली नं. ३० रूम नं. ०४ राई-शिवनेरी, उत्तनरोड भाईंदर पश्चिम यास ताब्यात घेऊन गुन्हयासंबंधीने चौकशी केली असता, सदरचा गुन्हा हा नमुद संशयीत आरोपीतानेच केल्याचे निष्पन्न केले. तसेच त्याचे ताब्यात ५ मोबाईल व ३०००/- रूपये कॅश असा मुद्देमाल मिळून आल्याने त्यास सदर गुन्हयात त्यास अटक करण्यात आली आहे. मिळून आलेले ५ मोबाईल कोठुन चोरी केले याबाबत तपास चालु आहे. अशा प्रकारे घरफोडीचा गुन्हा उघड करण्यात गुन्हेप्रकटीकरण पथकास यश आले आहे.

<u>**कामगिरी करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार :- १**</u>) वपोनि/जितेंद्र कांबळे २) पोनि/महेंद्र निंबाळकर, ३) सपोनि/माणिकराव कतुरे ४)पोउपनि/ प्रसाद गोवले ५) पोहवा/ रविंद्र भालेराव ६) पोहवा/राजेश श्रीवास्तव ७) पोहवा/सुशिल पवार ८) पोहवा/के पी पवार ९)पोहवा/के आर पवार १०) पोना/रामनाथ शिंदे ११) पो.अं./संजय



➤ **नवघर विभाग (रात्रौ घरफोडी) :-**

(नयानगर पोस्टे. गुरनं १८३/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे)

फिर्यादी दुर्गेशकुमार भरत सिंग, वय ४५ वर्ष,धंदा-व्यापार, रा. रुम नंबर १०४,सी-१२, सेक्टर नंबर ३, शांतीनगर मिरारोड पुर्व यांचे पुनमसागर येथील अस्मीता गार्डन गाळा नंबर २०, मधील महादेव पानबीडी दुकानाचे शटरची एक बाजुची कडी कापुन व दुस-या बाजुचे कुलुप तोडुन, कुणीतरी अज्ञात चोरटयाने , त्यावाटे आत प्रवेश करुन वेगवेगळया कंपनीचे सिगारेट पाकीटे, वायफाय सीसी टीव्ही कॅमेरा, सीपी प्लस कंपनीचा वायफाय राऊटर, असा एकुण ३५,८००/- रु किंमतीचा माल चोरुन नेल्याने नयानगर पोस्टे गुरनं I १८३/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे गुन्हा दिनांक दि.०१/०४/२४ रोजी दाखल आहे. सदर गुन्हयात आरोपीत महेंद्र थानाराम मेघवाल वय- २५ वर्षे रा अपनाघर फेज-२, काशिगाव काशिमिरा २) शैतानसिंग जसवंत सिंग जसवंत सोलंकी वय-३७ वर्षे रा प्रगती नगर नालासोपारा पु यांना निष्पन्न करुन दिनांक १/४/२०२४ रोजी अटक करुन सदर गुन्हयातील संपुर्ण गेलामाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यांचे विरुध्द सबळ पुरावे गोळा करुन मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले होते. सदर गुन्हयातील आरोपीत शैतानसिंग जसवंत सिंग जसवंत सोलंकी वय- ३७ वर्षे याने दि.०३.१२.२०२४ रोजी गुन्हा कबुल केल्याने मा.न्यायालयाने त्यास सी.आर.पी.सी २४८ अन्वये भा.द.वि.स कलम ३८०, ५४५, व ४५७ सह कलम ३४ या कलमां मध्ये ०८ महिने ०२ दिवसांचा कठोर करावासाची शिक्षा व १०००/- रु दंड, दंड न भरल्यास ०३ दिवस अतिरिक्त करावासाची शिक्षा सुनावली आहे. बाजुस नमुद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट कामगिरी केलेली असून त्यांनी यापुढेही अशीच कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून त्यांना बक्षीस मंजुर होण्यास विनंती आहे.

**कामगिरी करणा-या अधिकारी व अंमलदारांची नावे :-** १) वपोनि. अमर जगदाळे, २) पोहवा/०००१६ विकास यादव ( तपासिक अंमलदार ) ३) पोहवा/१२०२० प्रतिक सुर्यवंशी, ४) पोअं/२३१०५ संदीप माने सर्व नेम - नयानगर पोस्टे



➢ **गुन्हे शाखा, कक्ष - १ (दुखापतीसह जबरी चोरी) :-**

(नयानगर पोलीस ठाणे गुरनं. ४९९/२०२४ बी एन एस ३०९(६) प्रमाणे)

दि.३/१२/२०२४ रोजी ०९.३० ते ०५.०० वाजताचे सुमारास -रुम नं २०१,देवअर्पण सोसायटी, लक्ष्मी पार्क,लोढा रोड, नयानगर, मिरारोड पूर्व येथे यातील फिर्यादी श्रीमती फातीमा युसुफ ज्वाले, वय- ७२ वर्षे व्यवसाय-गृहिणी रा रु नं २०१, देवअर्पण सोसायटी, लक्ष्मी पार्क, लोढा रोड, नयानगर, मिरारोड पूर्व हया त्यांचे रहाते घरी एकटी असताना यातील अज्ञात आरोपीत याने आपण इलेक्ट्रीशन असल्याचे सांगून घरात प्रवेश करून त्यांना ठोश्याबुक्कयाने मारहाण करून दुखापती करून त्यांच्या हातातील १,२०,०००/- किं.रू. चार सोन्याच्या बांगड्या, चारही मिळून अंदाजे ३५ ग्रॅम वजन असलेल्या जु.वा.किं. स्वतःच्या फायद्यासाठी जबरीने चोरून नेल्या म्हणून दिले फिर्यादीवरुन नयानगर पोलीस ठाण्यात गु.रजि.नं. I ४९९ /२०२४ भारतीय न्याय संहीता -२०२३ कलम ३०९(६) प्रमाणे दाखल करण्यात आलेला आहे.सदर गुन्हयातील आरोपीत याचा गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा समांतर तपास करीत असतांना, घटनास्थळावरुन मिळालेल्या सिसीटीव्ही फुटेजचे तांत्रीक विश्लेषन करुन बातमीदार यांनी दिलेल्या माहीतीवरुन संशयीत आरोपीत यास दिनांक ०६/१२/२०२४ रोजी ताब्यात घेण्यात आलेले आहे. आरोपीत यांस त्याचे नांव विचारता त्याने आपले नांव मोहमद सलीम चौधरी वय-२३ वर्षे, धंदा नोकरी, रा. रुम नं. ४०४, डेफोडील बिल्डींग, फ्लॉवर व्हॅली, कानंगो गार्डन जवळ, नयानगर, मिरारोड पुर्व, ता.जि. ठाणे मो.नं. ७५७२८९९८३८ असे सांगीतले असुन त्याने सदर गुन्हाची कबुली दिलेली आहे.वरील नमुद गुन्ह्यातील आरोपीत

नामे (१) मोहमद सलीम चौधरी वय-२३ वर्षे, धंदा नोकरी, रा. रुम नं. ४०४, डेफोडील बिल्डींग, फ्लॉवर व्हॅली, कानंगो गार्डन जवळ, नयानगर, मिरारोड पुर्व, ता.जि. ठाणे मो.नं. ७५७२८९९८३८ यास पुढील कारवाई कामी वैद्यकीय तपासणी करुन नयानगर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आलेले आहे

**कामगिरी करणा-या अधिकारी व अंमलदारांची नावे :-** १) पो.निरी अविराज कुराडे २) सपोनिरी प्रशांत गांगुर्डे ३) सपोनिरी पुष्पराज सुर्वे ४) पोउपनिरी संदीप शिंदे ५) पो.हवा. अविनाश गर्जे ६) पो.हवा. संजय शिंदे ७) पो.हवा. विजय गायकवाड ८) पो.हवा. समिर यादव ९) पो.हवा. पुष्पेंद्र थापा १०) पो.हवा. संतोष लांडगे ११) पो.हवा. सचिन सावंत १२) पो.हवा. सचिन हुले १३) पो.शि. प्रशांत विसपुते १४) पो.शि. सौरभ इंगळे १५) पो.शि. धिरज मेंगाणे १६) पो.शि. गौरव बारी



## ➢ वसई विभाग (दरोडा) :-

(नायगांव पोस्टे. गुरनं. ६३३/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३१०(२),३३२(ब) प्रमाणे)

दिनांक १७/१२/२०२४ रोजी दुपारी ०२.४५ वा. चे रुम नं. सी-४०९ किणी कॉम्प्लेक्स,नायगाव पुर्व, ता-वसई जि.पालघर येथे आरोपीत यांनी आपसात संगणमत करुन झोमॅटो ऑर्डरचा बहाणा करुन फिर्यादी राहत असलेल्या रुममध्ये जबरदस्ती घुसले. व रुम मध्ये घुसलेल्या अनोळखी ५ आरोपीतांपैकी २ आरोपींनी यांनी फिर्यादी यांना हॉलमधील एका कोप-यात थांबवुन ठेवले. त्यानंतर उर्वरीत ०३ आरोपींनी हॉलमधील सामान तपासत असतांना हॉल मध्ये ठेवलेली ट्रॉली बॅग तपासली व त्यात ठेवलेली रोख रक्कम ५०,०००/- रू काढुन "किसी को बताया तो मार देंगे" अशी धमकी दिल्याने फिर्यादी यांनी नायगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात

अनुशंगाने नायगाव पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या वेगवेगळया टीम बनवुन सदर काळात पोलीस ठाणे अभिलेखावरील दाखल गुन्हयाच्या तपासाचे अनुषगांने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रीक विश्लेषण तसेच गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयांचा तपास करुन गुन्हेगार नामे १) फरान ऊर्फ मेहरबान कुरबान शेख, २) साहिल मन्सुर मुल्ला ३) जुनेद अल्ताप शेख, ४) अमित क्रिष्णा मंडल ५) राजन मफतलाल खारवा ६) सुरज कल्लु यादव७) घनश्याम देवनारायण राम ८) विकास पपु ओगानिया राहणार- चिजबंदर वाडा, डोंगरी, मुंबई यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयाच्या अनुशंगाने चौकशी केली असता त्यांनी गुन्हयाची कबुली दिल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली सदर आरोपीत यांच्याकडुन गुन्हयातील ३२,०००/- रुपये रोख रक्कम व गुन्हयात वापरण्यात आलेली इनोव्हा कार व आरोपीत याचे मोबाईल असे एकुण किंमत ५,७२,०५०/- रुपये जप्त करण्यात आले आहे.आरोपीत नामे राजन मफतलाल खारवा यांचेवर मुंबई शहर येथे यापुर्वी ०२ गुन्हे दाखल आहेत.

**कामगिरी करणा-या अधिकारी व अंमलदारांची नावे :-** १) वपोनि /श्री. विजय कदम २) पोनि/ प्रमोद पवार ३) सपोनि/रोशन देवरे, ४) सपोनि/गणेश केकान ५)पोहवा/०६०६४ सुनिल पाटील, ६) पोहवा/०२००८ मुनाफ तडवी, ७) पोहवा/०६१६२ नवनाथ तारडे, ८) पोहवा/०७०२१ शेखर पवार, ९)पोशि/१३०५७ सचिन ओलेकर, १०)पो.शि/१४१६५ सचिन मोहीते, ११)पोशि/१६०१२ सचिन खंताळ, १२)पोशि/१६०४८ जयवंत खंडवी, १३)पोशि/१६०४० अमर पवार, १४)पोशि/१४०२१५ चेतन ठाकरे, १५)पोशि/१७०१३ अशोक पाटील, १६)पोशि/२३१३३ पाडुरंग महाले १७)पोशि/अमोल बरडे



➢ **नालासोपारा विभाग (बालकांवरील लैंगिक अत्याचार) :-**

(बोळींज पोलीस ठाणे गुरनं. ६६/२०२४, भा.न्या.सं. २०२३ चेकलम ७४,७५ (१)(२),७८ (२) पोस्को ८,१२ प्रमाणे)

दिनांक १३/१२/२०२४ रोजी रात्रौ ०९:०० वाजताते ०९:३० वाजताचे दरम्यान अनुराधा जनरल स्टोअर्स,पटेल मेडीकल समोर, विरार(प.) येथुन शालेय प्रोजेक्टसाठी लागणारे साहित्य घेऊन कलावती माता मंदीराजवळुन फिर्यादी राहत असलेल्या इमारतीकडे वळाली त्यावेळेस काळया रंगाचा फुल हाताचा टि शर्ट, काळया रंगाची जिन्स पॅन्ट,आणि पायात सफेद रंगाचे स्पोर्टस् शुज घातलेला आणि तोंडाला काळया रंगाचा रुमाल बांधलेला एक अनोळखी मुलगा वय अंदाजे २० ते २३ वर्षे हा पाठीमागुन आला व त्यानेफिर्यादी यांचे मुलीला पाठीमागुन पकडुन तिच्या पोटावरुन व छातीवरुन हात फिरवुन तिच्या स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले म्हणुन फिर्यादीने दिलेल्या तक्रारी वरुन बोळींज पोलीस ठाणेस गुन्हा दाखल करण्यात आला. वरीष्ठांनी सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून त्यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदारतसेच गुन्हयाचे तपासिक अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. प्रथम पिडीत मुलीकडे तीचेवर नजर ठेवणा-या व्यक्तीबाबत, तसेच तीचेवैर असणा-या व्यक्तींबाबत चौकशी केली असता, काही एक माहीती मिळून आली नाही. गुन्हयाचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज पाहीले असता, एक संशयीत मोटार स्कुटर चालक पिडीत मुलीचा पाठलाग करुन पाठीमागून येऊन स्कुटर थांबवून मोटार स्कुटर चालू स्थितीत उभी करुन पिडीत ज्या गल्लीत गेली. त्या गल्लीत जाऊन पुन्हा बाहेर येऊन आरोपीत हा मोटार स्कुटर घेऊन पळून जात असतांना दिसत आहे.घटनेच्या वेळी अंधार असल्याने मोटार स्कुटर चालकाची ओळख पटविणे कठीण होते. तद्नंतर आरोपीताचे मार्गावरील जवळ जवळ ४० ते ५० सीसीटीव्ही कॅमेरे चेक करुन एका कॅमे-यात आरोपीत हा एका मुलीस घेऊन जात असून तो तीला कॅफे मध्ये सोडतांना दिसत होता. त्याप्रमाणे सदर कॅफेमध्ये त्या मुलीचा शोध घेतला. ती आरोपीत हीची मैत्रीण असल्याचे समजले. तीचेकडे केलेल्या तपासात सुशांत शशिकांत जाधव,वय-२७ वर्षे, यास निष्पन्न करुन त्यास दि.१९/१२/२०२४ रोजी अटक करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला.

**कामगिरी करणा-या अधिकारी व अंमलदारांची नावे :-** १) वपोनि/राजेंद्र तेंडुलकर २) पोनि/प्रकाश सावंत, (गुन्हे), ३) पो.उपनिरी./विष्णू वाघमोडे, ४) सफौ/९५०२० जनार्दन मते, ५) पोहवा/०३०६२ किशोर धनु, ६) पो.हवा./०७०३७ विलास पवार, ७) पो.अं./१४०७६ रोशन पुरकर, ८) पो.अं./१४१५९ प्रफुल सरगर, ९) पो.अं./१४१७९ सुखराम गडाख



------------oo--------------